पुढारी

# छत्रपती शिवाजी कॉलेजच्या छात्रसैनिकांची उत्कृष्ट कामगिरी

**कण्हेर : पुढारी वृत्तसेवा**

येथील २२ महाराष्ट्रीयन एन. सी. सी. बटालियन आयोजित ३१९ निमल ट्रेनिंग कॅम्प कमांडिंग ऑफिसर कर्नल दीपक ठोंगे आणि लेफ्टनंट कर्नल पराग गुप्ते यांच्या नेतृत्वाखाली दि. १३ ते १९ डिसेंबर दरम्यान महागाव येथे उत्साहात झाला. कॅम्पसाठी सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतून ४५१ छात्रसैनिक दाखल झाले होते. सात दिवसांच्या या प्रशिक्षण शिबिरात महाविद्यालयीन तरुणांना लष्करी प्रशिक्षण देऊन देशसेवेसाठी सक्षम बनवले जाते.



**शिबिरातील खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या छात्रसैनिकांना मेडल देऊन गौरविण्यात आले.**

कॅम्प कालावधीत आयोजित केलेल्या ड्रिल कॉम्पिटिशन, फायरिंग, खो-खो व टग ऑफ वॉर स्पर्धांमध्ये छ.शिवाजी कॉलेजच्या छात्रसैनिकांनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव लौकिक केले. सीनिअर अंडर ऑफिसर रोहित शिंदे, खुशी जांगिड यांनी उत्कृष्ट कॅम्प कमांडर म्हणून नेतृत्व केले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कमांडिंग ऑफिसर कर्नल ठोंगे यांच्या हस्ते बेस्ट कॅम्प कमांडर व बेस्ट कॅडेट मेडल देऊन अभिनंदन केले. अंडर ऑफिसर रोहित शिंदे यांना बटालियन सिनिअर अंडर ऑफिसर रँक प्रदान करण्यात आले. तर सार्जंट आकांक्षा मोरे हिने बेस्ट फायर मेडल मिळविले. प्रतीक्षा धनवडे, जयश्री कदम, रेखा मोरे यांनी विजयी खो-खो संघात उत्कृष्ट कामगिरी केली. तर कॅडेट सुचिता गायकवाड व सना शेख यांचेही शिबिरात मोलाचे सहकार्य लाभले. यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, एन.सी.सी.कंपनी कमांडर लेफ्टनंट केशव पवार, सुबेदार मेजर उदय पवार, सुभेदार दीपक शिंदे यांनी अभिनंदन केले.

ॲड. राहूल पी. अडागळे

ॲड. श्री. सुहास शशिकांत भंडारे
ॲडव्होकेट व नोटरी